आ० प्र०


# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


**परिपत्रक**

क्रमांकः२/एनजीसी/संकेतांक/२०१६/१४

दिनांक : 15 JAN 2016

संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र राज्यातील या संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्था संचालनालय व तत्सम कार्यालयांशी पत्रव्यवहार करताना त्यांच्या मुखपत्रावर (LETTER HEAD) संचालनालयाकडुन प्रदान करण्यात आलेला संकेतांक क्रमांक (DTE CODE) नमुद करत नाहीत. त्यामुळे कार्यवाही करताना तांत्रिक अडचणी निर्माण होतात.

परिणामी, महाराष्ट्र राज्यातील या संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (पदविका,पदवी, पदव्युत्तर पदवी) सर्व संस्थांना (शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित ) या परिपत्रकान्वये असे आदेशित करण्यात येते की, आपल्या संस्थेकडुन शासन, संचालनालय, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय त्याचप्रमाणे तत्सम कार्यालयांशी पत्रव्यवहार करताना संस्थेच्या मुखपत्रावर (LETTER HEAD) संचालनालयाकडुन प्रदान करण्यात आलेला संकेतांक क्रमांक (DTE CODE) ठळकपणे (BOLD)नमुद करण्यात यावा. त्याचप्रमाणे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.मभावा-२०१०/प्रक्र७५/२०-ब, दि.१४.०७.२०१० नुसार शासकीय कामकाजामध्ये राजभाषा मराठीचा वापर कटाक्षाने करण्यात यावा.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या निदर्शनास आणुन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देशित करण्यात यावे.

२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २अ, ४, ४अ, ५, ६, ८, ९, १०,११, १२, १३, १५, १६ यांना माहितीकरीता.

३. कार्यासन क्र.३ यांना माहिती व संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.